आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१२ जानेवारी २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

राज्यातल्या जिल्हा परिषद निवडणुका १५ फेब्रुवारीपर्यंत घेण्याची मुभा निवडणूक आयोगाला देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी आज महायुतीची प्रचारसभा; ठाकरे बंधूंच्या कालच्या प्रचारसभेत मुंबई वाचवण्यासाठी मतदान करण्याचं मतदारांना आवाहन

जर्मनीशी मैत्री आणि भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

महिलांच्या प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि यूपी वॉरियर्सशी यांच्यात सामना रंगणार

**<><><><><>**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयानं आज दिली. मतदान यंत्रांची कमतरता, प्रशासकीय अडचणी यासारखी कारणं देत राज्य निवडणूक आयोगानं ३१ जानेवारीची मुदत १० फेब्रुवारीपर्यंत वाढवून द्यावी, अशी विनंती केली होती. आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हापरिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. उर्वरित २० जिल्हापरिषदांच्या निवडणुकांच्या संदर्भात २१ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे.

**<><><><><>**

मुंबईत शिवाजी पार्कवर काल झालेल्या संयुक्त सभेत राज आणि उद्धव ठाकरे यांनी मराठी माणूस, मुंबई यासारख्या मुद्द्यांवर मतदारांना साद घातली. जवळजवळ २० वर्षांनंतर दोन्ही भावांनी शिवाजी पार्कवर संयुक्त सभा घेतली. मुंबईला वाचवण्यासाठी एकत्र आलो असून मराठीसाठीचं प्रेम रक्तातच असल्याचा दावा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला. मुंबईला गंभीर धोका असल्यामुळं एकत्र आल्याचं राज ठाकरे यावेळी म्हणाले.

कोणत्याही भाषेला विरोध नसून लादण्याला विरोध असल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. या सभेत त्यांनी भाजपावर टीका केली आणि अदानींच्या वाढत्या प्रकल्पांची उदाहरणं उपस्थितांसमोर सादर केली. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार व्यासपीठावर उपस्थित होते.

महायुतीची सभा आज शिवाजी पार्कवर होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रिपाईचे अध्यक्ष रामदास आठवले या सभेला उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

मुंबई आणि ठाण्याप्रमाणेच आता मीरा भाईंदरमधेही महायुती प्रभावी राहील, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. ते काल मीरा भाईंदर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारसभेत बोलत होते. “ही सभा प्रचाराची नाही, ही विजयाची नांदी आहे,” असं ते म्हणाले. गेल्या तीन वर्षांत मीरा-भाईंदरसाठी केलेल्या कामांचा पाढा त्यांनी वाचला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आणि शिवसेनेचे पदाधिकारीही या सभेला उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यात महापालिका निवडणुका होत आहेत. या अनुषंगाने प्रत्येक सजग आणि सुजाण नागरिकाने येत्या १५ तारखेला आपला मतदानाचा हक्क बजावावा आणि सुयोग्य मतदाराला निवडून द्यावं, असं आवाहन अभिनेत्री, निर्माती आणि दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांनी केलं आहे.

**- - होल्ड.. बाईट - मृणाल कुलकर्णी - -**

**- <><><><><>**

स्वामी विवेकानंद यांची १६३वी जयंती आणि राजमाता जिजाबाई यांची ४२८ वी जयंती आज राज्यभरात साजरी होत आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी स्वामी विवेकानंद यांना जयंतीदिनी आदरांजली वाहिली.

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडनवीस यांनी मुंबईत राजमाता जिजाबाई आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही

समाजमाध्यमावरल्या संदेशात स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाबाई यांना आदरांजली वाहिली.

**बुलडाणा** जिल्ह्यात सिंदखेडराजा इथे राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात असलेल्या जिजाऊंच्या जन्मस्थळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते शासकीय महापूजा पार पडली. यावेळी राजे लखुजी जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव, आमदार मनोज कायंदे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

**नांदेड** इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी, राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**छत्रपती संभाजीनगर** शहरात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त व्याख्याने, वाचन उपक्रम, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचं वाटप करण्यात येत आहे. विविध शाळेतल्या विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढली. तसंच युवकांची दुचाकी, चारचाकी वाहन फेरी देखील काढण्यात आली.

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आज **यवतमाळ** इथे स्वामीजींच्या अठरा फूट उंचीच्या पुतळ्याचं अनावरण झालं. सामका आयुर्वेद केंद्राच्या आवारात उभारलेल्या या पुतळ्याचं अनावरण रामकृष्ण मठाचे अध्यक्ष स्वामी राघवेन्द्रानंद महाराज यांच्या हस्ते करण्यात आलं.

**धुळे आणि रत्नागिरी** जिल्हाधिकारी कार्यालयात राजमाता जिजाबाई आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आज सकाळी प्रतिमा पूजन आणि अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**परभणी** इथे राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचं औचित्य साधून महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जनजागृती करण्यासाठी ‘वोट फॉर परभणी’ या पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

भारत जर्मनीशी मैत्री आणि भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी वचनबद्ध आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज अहमदाबाद इथे जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्यासह संयुक्त निवेदनात बोलत होते. संरक्षण क्षेत्रातलं औद्योगिक

सहकार्य मजबूत करण्यासाठी दोन्ही देशांनी विकास आणि उत्पादनासंबंधित घोषणापत्रावर स्वाक्षऱ्या केल्या. भारत आणि जर्मनीने आपल्या धोरणात्मक भागीदारीची २५ वर्षं पूर्ण केली असून यंदा दोन्ही देशांच्या राजनैतिक संबंधांना ७५ वर्षं पूर्ण होत आहेत. हे टप्पे सामायिक महत्त्वाकांक्षा, परस्पर विश्वास आणि सहकार्याला सातत्याने बळकटी देणारे आहेत, असंही मोदी म्हणाले. भारत आणि जर्मनीसारख्या प्रमुख अर्थव्यवस्थांमधल्या सहकार्याविषयी मोदी म्हणाले...

**होल्ड - बाईट - प्रधानमंत्री**

भारत आणि जर्मनी हे फक्त आर्थिक भागीदार नसून जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठीही वचनबद्ध आहेत असं सांगत द्विपक्षीय व्यापार ५० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाल्याचंही मोदी यांनी यावेळी अधोरेखित केलं. आर्थिक वाढीसाठी भारत-यूरोपियन यूनियन दरम्यान मुक्त व्यापार करार अंतिम करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चारही मोदी यांनी केला. जर्मनीबरोबरच्या सामायिक सांस्कृतिक वारशाच्या जोपासनेसाठी जर्मन सागरी संग्रहालयाच्या सहकार्याने लोथल इथल्या राष्ट्रीय सागरी वारसा संकुलाच्या विकासासाठी करारही करण्यात आला.

तत्पूर्वी मोदी आणि मर्झ यांच्यात आज गुजरातमध्ये गांधीनगर इथल्या महात्मा मंदिरात बैठक झाली. मर्झ यांचा हा पहिलाच दौरा असून विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. यावेळी गेल्या २५ वर्षांत भारत-जर्मनीदरम्यानच्या धोरणात्मक भागीदारीमध्ये झालेल्या प्रगतीचा आढावाही घेण्यात आला. तत्पूर्वी दोन्ही नेत्यांनी साबरमती आश्रमात महात्मा गांधींना अभिवादन केलं तसंच गांधीजींचं निवासस्थान असलेल्या हृदयकुंज इथं भेट देऊन चरख्यातून सूत कातण्याची प्रक्रियाही पाहिली. तसंच, अहमदाबादमध्ये साबरमती रिव्हरफ्रंट इथं आंतरराष्ट्रीय पतंग महोत्सवातही भाग घेतला.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये कोळसा घोटाळ्याच्या संदर्भात आयपॅक कंपनीवर टाकलेल्या छाप्यात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासह राज्य सरकारनं हस्तक्षेप केल्याचा तसंच अडथळे आणल्याचा आरोप करत ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी छापे टाकलेल्या ठिकाणांवर प्रवेश करून आयपॅक कंपनी परिसरातून दस्तऐवज आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांसह महत्त्वाचे पुरावे ताब्यात घेतल्याचा आरोप ईडीनं आपल्या याचिकेत केला आहे.

आयपॅक ही कंपनी राजकीय सल्लागार म्हणून काम करते. या कंपनीवर ईडीनं केलेल्या छाप्यासंदर्भात सुनावणीशिवाय कोणताही आदेश देऊ नये अशी मागणी करणारा कॅव्हेट पश्चिम बंगाल सरकारनं सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे. तसंच, छापेमारीच्या कारवाईत सहभागी झालेले ईडी कर्मचारी तसंच सीआरपीएफ जवानांची नावं आणि तपशील मिळवण्यासाठी पश्चिम बंगाल पोलिस ईडीशी संपर्क साधणार आहेत.

<><><><><>

महिलांच्या प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना यूपी वॉरियर्सशी होणार आहे. नवी मुंबईत डॉ. डी. वाय. पाटील मैदानावर आज संध्याकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल. हा या स्पर्धेचा पाचवा सामना आहे. पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने मुंबई इंडियन्सवर ३ गडी राखून विजय मिळवला होता. तर गेल्या शनिवारी झालेल्या सामन्यात यूपी वॉरियर्सला गुजरात जाएंट्स विरुद्ध १० धावांनी पराभव पत्करावा लागला होता.

<><><><><>

न्यूझिलंडविरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताने चार गडी राखून विजय मिळवला. ३०१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना सहा गडी गमावून भारतीय संघानं ४९ व्या षटकात ३०६ धावा करत हे आव्हान पार केलं.

//<><><><><>//